पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक - **१४**
सभावृत्तांत

दि.- **२/३/२०१६** वेळ दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि.२/३/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. **मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर – सभापती**
२. मा.आल्हाट मंदा उत्तम
३. मा.धनंजय मुरलीधर आल्हाट
४. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
५. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
६. मा.अजित दामोदर गव्हाणे
७. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
८. मा.श्रध्दा बाजीराव लांडे
९. मा. Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
१०. मा.रसाळ विजय सुदाम - स्विकृत सदस्य
११. मा.सोमवंशी प्रकाश ब. - स्विकृत सदस्य
१२. मा.संजय निवृत्ती आहेर – स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.चंद्रकांत इंदलकर – क्षेत्रीय अधिकारी**,** मा.श्रीनिवास दांगट- प्रशासन अधिकारी, मा.कैलास थोरात- कार्यकारी अभियंता, मा.श्री.संजय घुबे –उपअभियंता (स्थापत्य) मा.श्री.सतीश वाघमारे –उपअभियंता (स्थापत्य), मा.श्री.बोरावके व्ही.एच –उपअभियंता (स्थापत्य), मा.श्री.अंकुश कोंडे– उपअभियंता (पापु), मा.श्री.लांडे बी.पी.उपअभियंता विद्युत, मा.श्री.राऊत व्ही.एस. उपअभियंता (पाणीपुरवठा), मा.श्रीम.अर्चना आत्तारडे- उपअभियंता (पापु), मा.श्री.सदाशिव बगली- क.अभियंता (पापु), मा.श्री.कोतकर पी.बी.- क.अभियंता (पापु), मा.श्री.इप्पकायल एस.एच.- लेखाधिकारी, मा.श्री.टी.एच.दाते – सहा.आरोग्य अधिकारी, मा.श्री.रावते एम.डी. (उद्यान), मा.भानुदास किसन तापकीर – उद्यान अधिक्षक, मा.चव्हाण एच.एम.मुख्याध्यापक भोसरी, श्रीम.पाटील पी.एम.-पर्यवेक्षक शिक्षण मंडळ, श्रीम.भोज जे.एस.-क्रीडा पर्यवेक्षक, श्री.शिराळ एस.डब्ल्यू – मुख्याध्यापक लांडेवाडी, श्रीम.पवळे जे.आर. –समुह संघटक,

**मा.सभापती-** सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

**विषय क्रमांक १.** पूर्व-पश्चिम रस्ता १२.० मी.रुंदीचा करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ चे कलम २०५ अन्वये घोषित करणेबाबत.

**विषय क्रमांक २.** भोसरी जलतरण तलाव नामकरणे करणेबाबत मा. Adv.नितीन लांडगे यांचे पत्र.

**विषय क्रमांक ३.** २४ मीटर रस्त्यास नाव देणेबाबत. मा.Adv.नितीन लांडगे यांचे पत्र.

**विषय क्रमांक ४.** मोशी प्र.६ मध्ये १/१७५ खेळाचे मैदानास नामकरण देण्याबाबत.मा.धनंजय आल्हाट,मा.मंदाताई आल्हाट यांचे पत्र.

**विषय क्रमांक ५.** भोसरी बस टर्मिनलला नाव देणेबाबत. मा.वसंतराव (नाना) आनंदराव लोंढे यांचे पत्र.

-------

अ)दिनांक१५/०२/२०१६रोजी झालेल्या विशेषसभेचा(कार्यक्रमपत्रिका १३) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले**

ठराव क्रमांक- **२९** विषय क्रमांक- १

दिनांक- २/३/२०१६

सूचक- मा.अजित गव्हाणे अनुमोदक- मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे भोसरी येथील स.नं. २०१७ पै ते २१८ पै मंजूर विकास योजनेतील दक्षिणोत्तर १८.० मी.रुंद रस्त्यापासून पुर्व पश्चिम स.नं.२०७ पै,२०६ पै व २०५ पै मधून जागेवर असलेल्या कच्या स्वरुपातील सावंतनगर व महादेवनगरला जोडणारा रस्ता नाल्यापर्यंत आहे. सदरचा रस्ता तेथील स्थानिक नागरीक दळएवळणासाठी वापरत आहेत. तरी सदरचा रस्ता मनपाने ताब्यात घेऊन विकसीत केल्यास तेथील नागरिकांचा दळणवळणाचा प्रश्न कायमचा सुटणार आहे. तरी स.नं. २०७ पै,२०६ पै व २०५ पै मधून जाणारा विकास योजने व्यतिरीक्त पूर्व-पश्चिम रस्ता १२.० मी.रुंदीचा करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ चे कलम २०५ अन्वये घोषित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक- ३०                                        विषय क्रमांक- २

दिनांक- २/३/२०१६

सूचक- मा. Adv.नितीन लांडगे                                        अनुमोदक- मा.अजित गव्हाणे

संदर्भ – मा. Adv.नितीन लांडगे यांचे दिनांक २/३/२०१६ चे पत्र.

भोसरी गावठाण प्रभागामध्ये मनपा जलतरण तलाव आहे. सदर जलतरण तलावाला कै.बाळासाहेब बबनराव लांडगे जलतरण तलाव असे नांव देण्याचा ठराव मंजूर करण्यात यावा. कै. बाळासाहेब बबनराव लांडगे हे भोसरीच्या पंचक्रोशीतच नव्हे तर संपूर्ण पुर्ण जिल्हयाचे जलतरण वीर म्हणून प्रसिध्द होते. मनपाच्या अग्निशामक विभागात त्यांनी सेवा केली. कोणाचीही पाण्याची मोटार विहिरीतून काढणे. बुडालेले मृतदेह काढणे. पाण्यातून अंगठी बाहेर काढणे, वगैरे कठिण कामे करुन त्यांनी अनेकांना सहकार्य केलेले होते. त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता म्हणून सदर तलावास त्यांचे नांव देण्यास मान्यता देणेत येत आहे

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक- ३१                                        विषय क्रमांक- ३

दिनांक- २/३/२०१६

सूचक- मा.Adv.नितीन लांडगे                                        अनुमोदक- मा.अजित गव्हाणे

संदर्भ – मा.Adv.नितीन लांडगे यांचे दिनांक २/३/२०१६ चे पत्र.

अंकुशराव लांडगे नाटयगृह ते गुळवेवस्ती (नाल्यापर्यंत) चा २४ मीटर रस्त्यास भोसरी येथील प्रसिध्द गिर्यारोहक कै.रमेश नारद गुळवे यांचे नांव देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक- ३२                                        विषय क्रमांक- ४

दिनांक- २/३/२०१६

सूचक- मा.धनंजय आल्हाट                                        अनुमोदक- मा.मंदा आल्हाट

संदर्भ – मा.धनंजय आल्हाट मा.मंदाताई आल्हाट यांचे पत्र.

मोशी प्र.६ मध्ये १/१७५ खेळाचे मैदानास नामकरण देण्याबाबतची आरक्षणाची जागा ज्या मालकांची आहे त्यांनी आरक्षण विकसीत करण्याकरीता आरक्षण जागेचा ताबा दिला असून जागामालकांच्या परिवारातील खालील व्यक्तींची नांवे द्यावीत. १) खेळाचे मैदानास कै.अरुण भगवान आल्हाट क्रिडा संकुल/ क्रिडांगण २) त्या अंतर्गत होण्याचे वास्तुस- व्यायामशाळा – कै.वस्ताद शिवराम काशिबा आल्हाट, विरुंगळा केंद्र – कै.वस्ताद बबनराव सावळेराम आल्हाट अशी व्यक्तींचे नांवे देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक- ३३ विषय

क्रमांक- ५

दिनांक- २/३/२०१६

सूचक- मा.वसंतराव (नाना)लोंढे अनुमोदक- मा.Adv.नितीन लांडगे

संदर्भ – मा.वसंतराव (नाना) आनंदराव लोंढे यांचे २/३/२०१६ चे पत्र.

भोसरी उड्डाणपुलाखालील बस टर्मिनल-(बीआरटी बस स्टेशन) साठी प्रसिध्द किर्तनकार वैकुंठवासी ह.भ.प.ज्ञानेश्वर भिमाजी लोंढे (भोसरीकर माऊली )बस टर्मिनल असे नांव देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

**मा. सभापती-** यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही / -
मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
सभापती
इ प्रभाग समिती
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - ३९
क्र-इक्षेका/कावि/४/१०९/२०१६
दिनांक- १६/३/२०१६

सही/-
प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)
इ क्षेत्रीय कार्यालय
भोसरी – ३९.

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**दि.२/३/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे मासिक सभेत खालीलप्रमाणे मा.नगरसदस्यांनी चर्चा केली.**

**मा.मंदा आल्हाट –** आमचेकडे धुराची गाडी येत नाही. औषध फवारणी होत नाही. आरोग्य विभागाकडून गाडया वाढवल्या पाहिजे. तसेच नदीमध्ये जलपर्णी खूप झालेली आहे.

**मा.अजित गव्हाणे** – आमचेयेथील कचरा उचलला नाही. कचरा संकलन केंद्रासाठी रिझर्व जागा नाही.

**मा.चंद्रकांत वाळके -** कचरा संकलन केंद्राचे काम कोण करणार आहे.

**मा.अजित गव्हाणे-** कचरा संकलन केंद्राचा लोकांना त्रास होणार नाही अशा ठिकाणी करता येईल. आपल्या पालिकेचे काम काय आहे याबाबत माहिती घ्यायला काय हरकत आहे?

**मा.दाते (सहा.आरोग्याधिकारी)** – कचरा संकलन केंद्रासाठी जागा पाहिली असताना ही जागा नाही, ती जागा नाही असे असेल तर मी तरी जागा कुठे दाखविणार?

**मा.धनंजय आल्हाट** – आमचेकडील नदीमधील जलपर्णीचे काय झाले? हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. नदी सगळी हिरवी गार झाली आहे. जलपर्णी मा.आयुक्त साहेबांना दाखवले पाहिजे. जलपर्णी काढणेचे दहा टक्के सुध्दा काम झालेले नाही. याबाबत संबंधीत विभागाला किती वेळा पत्रव्यवहार केला आहे. या कामाला आता खूप वेळ झाला आहे.

**मा.विनया तापकीर (सभापती)** – संबंधीत विभागाला पत्रव्यवहार केला पाहिजे.

**मा.अजित गव्हाणे** – दातेसाहेबांच्या काळात किती बिले झाली आहेत? ही बाब फार गंभीर आहे. महापालिकेचे काम झाले नाही आणि पैसे कोणाला दिले? तुमचे पगारातून वसूल करण्यात येईल. मा.आयुक्त साहेबांना सांगितले जाईल. तुम्ही काय काम केले याबाबतचा तुमच्याकडील पुरावा दाखवा. पाच लाख रुपयांची काय कामे केली याबाबतचा पुरावा दाखवा.

**मा.दाते (सहा.आरोग्याधिकारी) –** इ प्र भागाचे अडीच लाख रुपयांचे व फ प्रभागाचे अडीच लाख रुपयांचे काम झाले आहे.

**मा.धनंजय आल्हाट –** सगळीकडे कचरा संकलन केंद्र असले पाहिजे. नाही तर पुढच्या वेळेस दिसला तर अधिका-यांच्या टेबलावर टाकीन. यात्रेतील लोकांना भांडी धुण्यासाठी, कपडे धुण्यासाठी, पुरेसे पाणी पाहिजे. नदीमध्ये सर्वत्र जलपर्णी वर आलेली आहे. आपलेकडे सगळे नाले घाण झालेले आहे, नाले तुंबल्यामुळे आरोग्याच्या दृष्टीने अतिशय घातक आहे. लोकांना त्याचा खूप त्रास होत आहे. आपलेकडे गुन्हा दाखल झालेला आहे. महाराष्ट्र प्रदुषणाचा गुन्हा दाखल झालेला आहे. नाले जेवढे आहेत त्यांच्या नोंदी करा. ड्रेनेज फुटले आहे प्रत्येकांचा सर्व्हे केला आहे का? हे सर्व कोर्टात मांडले तर नोक-या जातील. कुदळवाडीमध्ये सुध्दा हीच परिस्थिती आहे. पुढच्या सोमवारी प्रदुषण बोर्डचे लोक येणार आहे. हे सगळे दाखविणार आहे.

कुदळवाडीमध्ये रामदास कदम मुंबईहून लोक पाठविणार आहे. ठिसुळ कारभार चाललेला आहे. ज्येष्ठ नगरसेवक सांगूनही कुठलीच कामे होत नाही.

**मा.दाते (सहा.आरोग्याधिकारी) –** आरोग्य विभागाकडून यादी बनविलेली आहे. स्थापत्य विभागाला यादी दिलेला आहे.

**मा.सतीश वाघमारे उपअभियंता (स्थापत्य)-** स्थापत्य विभागला एकही पत्र आलेले नाही.

**मा.धनंजय आल्हाट** – नगरसेवकांना सांगितले आहे का? तुम्ही काय कारवाई केली ते आम्हाला सांगा.

**मा.दाते (सहा.आरोग्याधिकारी) –** प्रभाग क्र.६ मोशी येथे इंद्रायणी नदीच्या ठिकाणी स्मशान भूमीलगत कचरा संकलन केंद्रासाठी जागा आहे. तसेच इंद्रायणी नगर या ठिकाणी व अग्निशामक केंद्राच्या जवळ त्या ठिकाणी कचरा संकलन केंद्राच्या जागा आहे.

**मा.अजित गव्हाणे** – या जागा महापालिकेच्या आहेत का हे पाहिले पाहिजे. खाजगी जागा असेल तर जागामालकाशी बोलावे लागेल.

**मा.दाते (सहा.आरोग्याधिकारी) –** प्रभाग क्र.३१ दिघी येथील गवळी उद्यान व डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान समोर जागा आहे.

**मा.अजित गव्हाणे –** महापालिकेच्या जागेत अग्निशामक विभागाजवळ सुचविले आहे. पाण्याची टाकी आहे ती जागा पाहिली पाहिजे.

**मा.विनया तापकीर (सभापती) –** जागा पाहणेचे काम आजचे आज करुन घ्यायला पाहिजे.

**मा.अजित गव्हाणे –** ज्या ठिकाणी जागा सुचविली आहे तेथे शेड, कंपाऊंड करुन देता येईल का? याबाबत काय अडचण आहे?

**मा.धनंजय आल्हाट -** तुम्ही सर्व जबाबदारी व्यक्ती आहात. तुमची जबाबदारी आहे. आता तरी जागांबाबत नगररचना विभागाला कळवा.

**मा.विनया तापकीर (सभापती) –** स्थापत्य, आरोग्य विभागांना सांगितले पाहिजे. त्यांचेसोबत साहेबांनी मिटींग घेतली पाहिजे.

**मा.धनंजय आल्हाट -** मोशी प्र.६ मध्ये १/१७५ खेळाचे मैदानास कै.अरुण भगवान आल्हाट क्रिडा संकुल/ क्रिडांगण नामकरण देण्यबाबत ठराव मंजूर करण्यात यावा.

**मा.मंदा आल्हाट -** कै.अरुण भगवान आल्हाट यांचे मालकीची जागा आहे का?

**मा.धनंजय आल्हाट –** दिनांक ७/८/९ मार्च रोजी मोशी येथे नागेश्वर उत्सव यात्रा साजरी होणार आहे. त्यावेळी पाण्याचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे पाणीपुरवठा वाढविण्यात यावा. च-होली, मोशी येथे पाण्याचा प्रोब्लेम होऊ देऊ नका. आरोग्य विभागाकडून साफ सफाईचे काम व्यवस्थित झाले पाहिजे.

**मा.विनया तापकीर (सभापती) –** च-होलीमध्ये डस्टबीन ठेवण्यात याव्यात. मोशी, च-होलीमध्ये पाणीपुरवठा व्यवस्थित करणे. अजिबात पाण्याचा प्रोब्लेम झाला नाही पाहिजे.

**मा.अजित गव्हाणे –** स्थापत्य, विद्युत, व इतर विभागाचे बाकीचे इंजिनिअर मिटींगला का आले नाही.

**मा.विनया तापकीर (सभापती) -** नगररचना विभागाचे कोणी आले आहे का? उद्यान विभागाचे कोणी आले नाही. मिटींगचे काय गांभीर्यच नाही. स्थापत्य विभागाचा विषय बोलून घ्या. कच-याचा विषय पुर्ण करा.

**मा.क्षेत्रीय अधिकारी** – स्थापत्य विभागातील अधिका-यांशी बोलणे झाले आहे. कचरा संकलन केंद्रासाठी पत्राशेड करुन देणार आहेत. भोसरी विभागासाठी एक संकलन केंद्र, दिघीसाठी सखुबाई गवळी उद्यानमध्ये मोकळया जागेत संकलन केंद्र होईल. आमच्या या ठिकाणी कचराकुंडी नको, त्या ठिकाणी नको असे नागरीकांकडून ऐकावे लागते. याबाबत सर्वांनी सहकार्य करणे अपेक्षित आहे. कचरा संकलन केंद्रासाठी पत्राशेड लावले जातील. कचरा पसरणार नाही हे पाहिले जाईल.

**मा.अजित गव्हाणे –** पाणीपुरवठाबाबत परमनंट सोल्युशन केले पाहिजे. धुराच्या गाडया घरोघर गेल्या पाहिजे. उद्या कचरा उचलला जाईल याची दक्षता घ्यावी.

**मा.दाते (सहा.आरोग्याधिकारी) –** कचरा उचलण्यासाठी एक खेप करण्याऐवजी दोन खेपा वाढवल्या जातील.

**मा.अजित गव्हाणे –** कचरा संकलनकरीता किती स्पॉट झाले आहे. तुम्ही जागा निवडली का? शासनाची परवानगी आहे का? १० टक्के जागा निवडली पाहिजे.

**मा.तावरे (मुख्य आरोग्य निरीक्षक)** – आशिर्वाद गॅस एजन्सीजवळ कचरा संकलन केंद्र करता येईल. औंध येथे कचरा हस्तांतरण केंद्र आहे. तसे आपल्याकडे असावे. आपल्याकडे खूप आवश्यकता आहे.

**मा.अजित गव्हाणे –** इ प्रभागाचे अंतर्गत वॉर्डमध्ये दिघी, चक्रपाणी वसाहत, सॅण्डविक कॉलनी, कचरा संकलन केंद्र होईल. आम्हाला ही कामे करुन पाहिजे. इंद्रायणीनगर, गव्हाणेवस्ती, लांडेवाडी, भोसरी गावठाण या ठिकाणी काय करणार आहे? नागरीकांची अशी मागणी आहे की, कचरा संकलन केंद्राला पत्राशेड टाकून बंदिस्त असला पाहिजे.

**मा.क्षेत्रीय अधिकारी -** कचरा संकलन केंद्राला पत्राशेड टाकून बंदिस्त केले जाईल.

**मा.अजित गव्हाणे –** ते काम पुर्ण करुन देण्याची जबाबदारी स्थापत्य विभागाची आहे. कायदेशीरपणे कार्यवाही करण्यात यावी.

**मा.क्षेत्रीय अधिकारी -** कचरा संकलन केंद्राला पत्राशेड बांधण्यासाठी पाच दिवस लागतील. तत्पुर्वी काय व्यवस्था करता येईल हे पाहण्यात येईल.

**मा. Adv.नितीन लांडगे –** आमचे येथे भोसरी गावठाणमधील एप्रिल मध्ये यात्रा आहे. रस्ते खोदाईचे काम झालेले आहे. रस्ते खोदण्याची परवानगी आहे का नाही हे माहित नाही. परवानगी यापुर्वी घेतलेली आहे. आता पैसे भरलेले नाही. रस्ता पुर्ण खोदलेला आहे. त्या रस्त्यावरुन चालता येत नाही. तरी त्या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात यावे.

**मा.विनया तापकीर (सभापती)** - च-होलीचे रस्ते खराब झालेले आहेत. रस्त्यांचे डांबरीकरण करण्यात येत आहे.

**मा.अजित गव्हाणे -** ४५ मीटर प्रमाणे प्लॅनींग करणार आहे.

**मा.विनया तापकीर (सभापती) –** डांबरीकरणाचे किती दिवस झाले काम झाले नाही.

**मा.धनंजय आल्हाट** – आमचेकडे कोणी वाली आहे का नाही. नेमके काम कोण करणार आहे? पावसाळा येण्यापुर्वी खराब रस्त्याचे काम करण्यात यावे.

**मा.क्षेत्रीय अधिकारी** – मुख्य कार्यालयाकडे ते काम आहे.

**मा.धनंजय आल्हाट –** सध्या काम चालू आहे. मला फोन आला होता. आपल्या साईडने काम चालू आहे. आपल्या वॉर्डमध्ये रस्ता खोदाईचे काम चालू आहे. आपले हद्दीत काम चालू आहे.

**मा.विनया तापकीर (सभापती)** जिम्नॅशियम व स्विमिंग पुलाचे काय झाले?

**मा.नाना लोंढे** – पाणीपुरवठा कमी प्रमाणात का आहे याची आम्हाला माहिती दया.

**मा.अंकुश कोंडे –(उपअभियंता पाणीपुरवठा)** – बरशेट्टी साहेबांबरोबर मी चर्चा करतो आणि त्यानंतर सांगतो.

**मा.चंद्रकांत वाळके** – NOC बाबत काही अधिकार आहेत का?

**मा.पवार – (क.अभियंता पाणीपुरवठा)** भिमा शंकरची लाईन जोडली आहे.

**मा.चंद्रकांत वाळके –** माने साहेब होते तेंव्हा आमचे पाण्याचे हाल नव्हते. तुम्ही अजिबात लक्ष देत नाही. दोन दोन महिने निर्णय घेत नाही. क.अभियंता यांनी कुणाच्या सांगण्यावरुन पाणी देणे कमी केले आहे.

**मा.बगली (क.अभि यंता, पाणीपुरवठा) –** सध्या आम्ही पाणी देण्याचे १० टक्के कमी केले आहे.

**मा.क्षेत्रीय अधिकारी –** मी पाणी पुरवठा विभागातील अधिकारी/कर्मचारी यांची मिटींग घेतो.

**मा.अजित गव्हाणे –** किती टक्के पाण्याची कपात होते. तुम्ही लोकांना सांगितले पाहिजे की, पाणी जपून वापरा. व त्यानुसार पाणीपुरवठा केला पाहिजे.

**मा.विनया तापकीर (सभापती) –** प्रत्येक प्रभागामध्ये तुम्ही पाणी बाबत जनजागृती करा. प्रत्येक प्रभागातून रिक्षा फिरवा.

**मा.अजित गव्हाणे** - तुमचा कंट्रोल नाही लोकांवर . बरेच प्रश्न आहेत. स्थापत्य, पाणीपुरवठा व इतर विभागांची मिटींग घेतली पाहिजे.

**मा.क्षेत्रीय अधिकारी –** पाणीपुरवठा व इतर वि भागाची मी मिटींग घेणार आहे.

**मा.अजित गव्हाणे –** एमआयडीसीचे आपण पाणी घेतो. गुरुवारी पाणी येत नाही याबाबतची माहिती पेपरला दिली पाहिजे.

**मा.धनंजय आल्हाट** – मोशीमध्ये फ्लेक्सचे माहेरघर झालेले आहे. सगळीकडे जाहिराती फ्लेक्सची गर्दी झालेली आहे.

**मा.क्षेत्रीय अधिकारी** – होर्डींग, फ्लेक्स बाबत आढावा मिटींग घेण्यात येईल.

**मा.धनंजय आल्हाट -** होर्डींग, फ्लेक्स बाबत मिटींग घेण्याच्या अगोदर फ्लेक्सचा पंचनामा करायचा. फ्लेक्सची लांगी, रुंदी याबाबत परवाना आहे का नाही हे पाहिले पाहिजे. याबाबतची सर्व छाननी करुन पंचनामा प्रकारबाबत मा.आयुक्त साहेबांना कळविले पाहिजे. ब-याच जणांनी रिटपिटीशन केलेले आहे. सगळया नगरसेवकांना सुध्दा पत्र पाठवावे. मिटींग स्थापन होऊन किती वर्षे झाली? याबाबत मिटींगमध्ये जी काही कारवाई होईल त्याला तुम्ही सर्वस्वी जबाबदार आहे.

**मा.क्षेत्रीय अधिकारी** – हायकोर्टात निर्णय झालेला आहे. १५५/२०११ या कॉपी दिलेल्या आहे. अनाधिकृत फ्लेक्स बाबत फौजदारी दाखल करतील. कोर्टात दावा दाखल करतील. होर्डींग बाबत आकाश चिन्ह परवाना विभागाकडे कामकाज आहे.

**मा.विनया तापकीर (सभापती) –** प्रत्येक दिवशी एका विभागाची मिटींग घ्यावी.

**मा.संजय निवृत्ती आहेर – स्विकृत सदस्य –** ३० फुटांची उंच झाडे होती. ती झाडे कशी तोडली,कशी पडली त्यांचेवर कारवाई केली पा हि जे.

मा. (उद्यान) – मा.आयुक्त साहेबांचे झाडे तोडण्याचे आदेश होते. बोगनवेलची झाडे लावली पाहिजे.

**मा.विनया तापकीर (सभापती) –** नागरवस्ती विभागाकडून सायकली वाटप चालू केल्या आहे का?

**श्रीमती पवळे** – आपलेकडे ८५ सायकली आल्या आहेत.

**मा.मंदा आल्हाट** – शिलाई मशिन आल्या आहे का?

**श्रीमती पवळे** – शिलाई मशिन अजून आल्या नाहीत.

**मा.विनया तापकीर (सभापती) –** पुढच्या वेळेस मिटींगला सर्व अधिकारी आले पाहिजे.

**मा.धनंजय आल्हाट** – प्रश्न उपस्थितीत केले आहेत. त्याचा आढावा घेतला पाहिजे. मिटींग घेतली पाहिजे. जेवढे प्रश्न उपस्थित केले आहे ते सर्व गंभीर आहेत ते सर्व व्यवस्थित सोडवल्या शिवाय मिटींग होणार नाही. स्पष्टीकरण दिल्या शिवाय आम्ही मिटींग होऊ देणार नाही.

**मा.अजित गव्हाणे –** अतिक्रमण बाबत आता आम्ही सर्वजण बोललो आहोत. याबाबत सुध्दा गंभीर घेतले पाहिजे.

**मा.सुरेखा गव्हाणे** – आमचे येथे बसस्टॉपजवळ चायनीजच्या गाडया आहेत त्या हटवल्या पाहिजे.

**मा.विनया तापकीर (सभापती) -** यानंतर सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.